# ‘प्रसिध्दी पत्रक’

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**शनिवार, दि.१४/०९/२०१९**

## “शनिवार तक्रार अर्ज निवारण दिन- पोलीस ठाणे स्तरावर १४५ तक्रारींचे निवारण.”

**पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद:** उस्मानाबाद जिल्हा पोलीस दलात पोलीस ठाणे स्तरावर प्रत्येक शनिवारी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वा. या वेळेत तक्रार निवारण दिन आयोजित केला जात आहे. त्यानुषंगाने काल दि. १४.०९.२०१९ रोजी आयोजित तक्रार निवारण दिनी पोलीस मुख्यालयातील वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी विविध पोलीस ठाणे येथे भेटी दिल्या. तसेच तक्रारदार, विरोधक यांच्याशी समन्वय साधुन यापुर्वीच संबंधीत पोलीस ठाण्यात दिलेल्या विविध स्वरुपातील एकुण १४५ तक्रारींचे निरसन केले आहे.

यापुढेही पोलीस मुख्यालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रत्येक शनिवारी पोलीस ठाण्यास सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वा. या वेळेत भेट देवुन तक्रारदारांनी यापुर्वी संबंधीत पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारींचे निरसन करणार आहेत. तरी तक्रारदार- विरोधक यांनी योग्य त्या कागद पत्रे पुराव्यांसह तक्रार अर्ज सादर केलेल्या संबंधीत पोलीस ठाण्यात शनिवारी हजर राहुन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे. असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद श्री. राज तिलक रौशन यांनी केले आहे.

## “अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार, आईच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) :** १) नागनाथ सोपान घोडके २) योगेश सोपान घोडके ३) रामेश्वर अर्जुन कांबळे ४) रामेश्वर अर्जुन कांबळे व अन्य ४ महिला सर्व रा. _ अमला ता.माजलगाव, जि.बीड (ह.मु. सिध्द पेठ, केळगाव, गुलाबराव मुंगसे चाळ, आळंदी, पुणे) यांनी एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे आमिष दाखवुन तिचे दि. २३.०६.२०१९ रोजी अपहरण केले. तेंव्हापासुन नागनाथ सोपान घोडके याने आज पर्यंत त्या अल्पवयीन मुलीवर अनेकदा लैंगिक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीत अल्पवयीन मुलीच्या आईने मा.न्यायालयात दिलेल्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) येथे भा.दं.वि. कलम ३६३, ३६६ (अ),४२०, ३४ सह पोक्सो कायदा कलम ४, ८, १२ प्रमाणे गुन्हा दि. १४.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “सोनारी: अपत्य जन्म लपवण्यासाठी स्त्री जातीचे अर्भक पाण्यात टाकले.”

**पोलीस ठाणे, आंबी :** मौजे सोनारी येथील काल भैरवनाथ मंदीर परिसरात असलेल्या पाण्याच्या कुंडामध्ये दि. १४.०९.२०१९ रोजी ०८.३० वा.सु. एक नवजात स्त्री अर्भक मृत अवस्थेत आढळले. अर्भक जन्म लपवण्याच्या उद्देशाने कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्या अर्भकास जिवंत किंवा मृत अवस्थेत या ठिकाणी टाकले आहे. अशा मजकुराच्या संजय चंद्रकांत पुजारी रा.सोनारी यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द पोलीस ठाणे, आंबी येथे भा.दं.वि. कलम ३१८ प्रमाणे गुन्हा दि. १४.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "बेकायदेशिर जमाव जमवुन मारहान."

**<u>पोलीस ठाणे, उमरगा :</u>** १) विशाल भालेराव २) अमर भालेराव ३) सुरज शिंदे ४) विशालची भालेराव याची आई व अन्य १० ते १५ स्त्री-पुरुष सर्व रा. उमरगा यांनी आपापसात संगणमत करुन दि. १३.०९.२०१९ रोजी २२.०० वा.सु. जयवंत वसंतराव जाधव रा. उमरगा यांना एकोंडी रोड, उमरगा येथे आडवुन "तु आमच्या विरोधात तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यास का गेला." असे दरडावुन त्यांना व त्यांचे शेजारी मधुकर यादव यांना शिवीगाळ केली, व लाथा-बुक्यांनी, पट्टयाने मारहान करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या जयवंत वसंतराव जाधव यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३४१, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दि. १४.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

## "बेंबळी: भांडण सोडवणाऱ्यास मारहान."

**<u>पोलीस ठाणे, बेंबळी :</u>** शुभम गोविंद शिडोळे रा. शिवाजी चौक, बेंबळी यांनी सुरेश खापरे व प्रथमेश माने यांचे भांडण सोडवले होते. याचा राग मनात धरुन १) उमाकांत लक्ष्मण खापरे २) प्रशांत उमाकांत खापरे ३) सुरेश अर्जुन खापरे सर्व रा. शिवाजी चौक, बेंबळी यांनी आपापसात संगणमत करुन दि. १२.०९.२०१९ रोजी २१.३० वा.सु. आजोबा गणपती मंदीरासमोर, बेंबळी येथे शुभम शिडोळे यांना "तु दोस्ताच्या भांडणामध्ये का पडलास" असे दरडावुन त्यांना शिवीगाळ करुन लाथा-बुक्यांनी, काठीने मारहान करुन जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या शुभम शिडोळे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १३.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "दोन मोटारसायकलचा अपघात."

**<u>पोलीस ठाणे, भुम :</u>** सुनिल भरत सोन्ने रा. वडगाव (नळी), ता.भुम हे दि. २७.०७.२०१९ रोजी १८.०० वा.सु. मित्र अजय महानवर यास मोटारसायकलवर घेवुन वडगाव (नळी) गावाकडे जात होते. वडगाव (नळी) फाट्या जवळ मोटारसायकल क्र. एम.एच. ०९ एक्स.ए. १५३७ च्या अज्ञात चालकाने त्याची मोटारसायकल निष्काळजीपणे चालवुन सुनिल सोन्ने यांच्या मोटारसायकलला धडक दिली. यामध्ये सुनिल सोन्ने हे जखमी झाले. यावेळी सदर मोटारसायल चालकाने जखमींना औषधोपचारास न नेता व पोलीसांना अपघाताची खबर न देता मोटारसायकल जागीच सोडुन पळुन गेला. अशा मजकुराच्या सुनिल भरत सोन्ने यांनी वैद्यकिय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी.) वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, भुम येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १३४ (अ) (ब), १८४ प्रमाणे गुन्हा दि. १३.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "विद्युत खांब पाडुन शासकिय मालमत्तेचे नुकसान."

**<u>पोलीस ठाणे, उमरगा :</u>** मौजे मुळज, सर्वे नं. ३०१, ३०२ मध्ये येथे नगर पालिका, उमरगा तर्फे उभारल्या जात असलेल्या भाकड म्हशींचा आधुनिक कत्तलखान्यास विद्युत पुरवठा करणारे विद्युत खांब दि १०.०९.२०१९ रोजी २३.०० ते दि. ११.०९.२०१९ रोजी ०६.०० वा.चे दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पाडुन व मोडुन शासकिय मालमत्तेचे ३,५०,०००/-रु. चे नुकसान केले. अशा मजकुराच्या मदार रशीद शेख

स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद, उमरगा यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे सार्वजनिक मालमत्ता विद्रुपन कायदा कलम ३ प्रमाणे गुन्हा दि. १३.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“अवैध मद्य विक्री विरुध्द कारवाई”**

**पोलीस ठाणे, शिराढोण :** दि. १३.०९.२०१९ रोजी १६.३० वा. हिराबाई मच्छिंद्र चव्हाण रा. बोरगाव, ता.कळंब ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे बोरगाव शिवारात १० लिटर गावठी किं.अं. ५५०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, शिराढोण यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, शिराढोण येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १३.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: ७० कारवाया.”**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. १३/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार ७० कारवाया केल्या असुन त्यातुन १५,१०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

**(विनोद ज. चौधरी)**

सहा.पोलीस निरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद